सत्यमेव जयते

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

## MAHARASHTRA PUBLIC SERVICE COMMISSION

बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, महात्मा गांधी मार्ग, हुतात्मा चौक, मुंबई ४००००१ २२६७ ०२१० /१४८ /२४८,२२६०२२२२ फॅक्स : २२६७३९१५

Bank of India Bldg, 3rd floor, Mahatma Gandhi Road, Hutatma Chowk, Mumbai 400001 2267 0210 /148 /248, 22602222 Fax : 22673915

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, www.mpsconline.gov.in

### उपसंचालक अर्थ व सांख्यिकी संचालनालय, सामान्य राज्य सेवा, गट-अ

**धारिका क्रमांक ८७९/२९८/२०१२/VIII** **जाहिरात क्रमांक: ३१८/२०१२**

आयोगामार्फत अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, मुंबई या कार्यालयाच्या आस्थापनेवरील **उपसंचालक, सामान्य राज्य सेवा गट -अ** या संवर्गातील एकूण **२१** पदांच्या भरतीसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. या पदासाठी अर्हताप्राप्त असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.

**२.** उपलब्ध पदसंख्या :- सर्वसाधारण भरती (१८ पदे)

| अ. क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | वि.मा.प्र | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उप संचालक,अर्थ व सांख्यिकी संचालनालय, गट-अ | | ६ | २ | -- | --- | --- | --- | १ | --- | २ |
| | **सर्वसाधारण उपलब्ध पदसंख्या एकूण -१८** | महिला - | ३ | १ | -- | -- | -- | --- | १ | -- | १ |
| | | खेळाडू - | १ | -- | --- | --- | --- | --- | -- | --- | -- |
| | | अपंग | | | | | | | | | |

**विज्ञापित एकूण १८ पदांपैकी १ पद श्रवण शक्तीतील दोष ( Hearing impairment) अपंग प्रवर्गाकरीता राखीव - अनुषेशाची (३ पदे)**

| अ. क्र. | पदाचे नाव व एकूण पदसंख्या | | अराखीव | अ.जाती व त्यातील बौध्द धर्मांतरित | अनुसूचित जमाती | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | वि.मा.प्र. | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उप संचालक,अर्थ व सांख्यिकी संचालनालय, गट-अ | | --- | -- | २ | -- | --- | --- | --- | -- | -- |
| | **अनुषेशाची पदे एकूण -३** | महिला - | --- | -- | १ | --- | --- | -- | --- | --- | --- |
| | | खेळाडू - | --- | ---- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | अपंग | --- | | | | | | | | |

**२.१** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागाच्या सूचनेनुसार बदल होण्याची शक्यता आहे.

**२.२** शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. न्यायाप्र-२०११/प्र.क्र.४/सुधार-३, दिनांक १७ मार्च, २०११ नुसार तसेच शासन निर्णय क्र. न्यायाप्र-२००९/प्र.क्र.९/सुधार-३ दिनांक १३ ऑगस्ट, २००९ च्या अनुषंगाने **(अ) अंध/क्षीणदृष्टी (Blindness or Low Vision) (ब) श्रवण शक्तीतील दोष (Hearing impairment) (क)) चलनवलनविषयक विकलांगता किंवा मेंदूचा अर्धांगवायु [Locomotor disability or Cerebral palsy]** या अपंग प्रकारात येणारे उमेदवार प्रस्तुत पदासाठी अर्ज करण्यास पात्र आहेत.

**२.३** शासन आदेशानुसार वि.जा (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) वर्गवारीतील पदे आंतरपरिवर्तनीय असून एखाद्या वर्गवारीतील पात्र उमेदवार न आढळल्यास वि.जा (अ), भ.ज. (ब), भ.ज. (क) व भ.ज. (ड) या वर्गवारीतील उपलब्ध पात्र उमेदवारांमधून सदर पदे भरण्यात येतील.

**३.** वेतनश्रेणी- १५,६०० - ३९,१०० + ग्रेड पे ५,४००/-

**४. पात्रताविषयक अटी** :-

**४.१** भारतीय नागरिक.

**४.२ वय**:- (१) दिनांक **१ एप्रिल , २०१३** रोजी **कमाल वयोमर्यादा ३५** वर्षे आणि मागासवर्गीयांसाठी **४०** वर्षे.

**४.३** उच्च वयोमर्यादा ख़ालील बाबतीत शिथिलक्षम:-

(१) मागासवर्गीयांसाठी वयोमर्यादा **५** वर्षे शिथिलक्षम,

(२) महाराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा **१०** वर्षे शिथिलक्षम राहील.

(३) अपवादात्मक शैक्षणिक अर्हता आणि /किंवा अनुभव असल्यास उच्चवयोमर्यादा शिथीलक्षम करण्याबाबत आयोगाकडून विचार करण्यात येईल. **आयोगाच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चतम शैक्षणिक अर्हतेच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हताप्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील. अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिलीकरणास्तव विचारात घेतला जाईल.**

(४) शासन आदेशानुसार माजी सैनिक व खेळाडू इत्यादीसाठी वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

**४.४. शैक्षणिक अर्हता**:-

**४.४.१** Master's degree with atleast 50 per cent marks in Statistics or Biometrics or Econometrics or Mathematical Economics; **OR**

**४.४.२** Master's degree with atleast 50 per cent, marks in Mathematics or Economics or Commerce with atleast one paper of 100 marks in Statistics or Mathematical Economics or Econometrics; OR

**४.४.३** Master's degree with atleast 50 per cent marks in Mathematics or Economics or Commerce and a post graduate diploma in Statistics of a recognized institution; OR

४.४.४ Master's degree with atleast 50 per cent marks in Mathematics or Economics or Commerce and a certificate of a course in demography or Population Science of a recognized institution; AND THEREAFTER

**५. अनुभव** -

**५.५.१** Possess not less than three years experience in advanced Statistical work including conducting of large scale sample surveys or Statistical or Economical analysis or use of Statistical techniques in the area of planning or evaluation studies or development of different computer software, etc. in Government or reputed organization, concerned with development programmers, gained after acquiring the qualification mentioned in (4.4) above, out of which atleast two years experience should be in responsible supervisory or administrative position similar to Group B Officer of Government:

**५.५.२** A candidate holding Doctorate (Ph. D.)in Statistics or Econometrics or Mathematical Economics; may also be considered, for being appointed by nomination if he is having two years post doctoral experience. which should be in a supervisory or administrative position equivalent to Group- B Officer of the Government.

**६** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादी अर्हता किमान असून किमान अर्हता धारण केली म्हणून उमेदवार मुलाखतीस बोलाविण्याकरीता पात्र असणार नाही. जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जांची संख्या वाजवी प्रमाणापेक्षा जास्त असेल आणि अर्ज सादर केलेल्या सर्व पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेणे सोईस्कर नसल्यास मुलाखतीसाठी उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने जाहिरातीत दिलेल्या शैक्षणिक अर्हता आणि/अथवा अनुभव यापेक्षा जादा शैक्षणिक अर्हता/अनुभव यांच्या आधारे निकष निश्चित करुन अथवा चाळणी परीक्षेद्वारे मुलाखतीस पात्र उमेदवारांची संख्या मर्यादित करण्यात येईल. चाळणी परीक्षा घेण्याचे निश्चित झाल्यास, अर्हता आणि/अथवा अनुभव शिथिल केला जाणार नाही. चाळणी परीक्षेचा अभ्यासक्रम, परीक्षेचे माध्यम व इतर बाबी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील.

**७. कर्तव्ये व जबाबदाऱ्या** - प्रस्तुत पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्या याबाबतचा तपशील आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

८. प्रस्तुत पदांना शासनाने दिनांक ८ जून २०१० रोजी निर्गमित केलेली “महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी विभागीय संवर्ग संरचना व विभागीय संवर्ग वाटप याबाबत नियमवली २०१०” लागू आहे

९. प्रस्तुत जाहिरातीमध्ये भरतीसंदर्भातील संक्षिप्त तपशील दिलेला आहे. अर्ज करण्याची पद्धत, आवश्यक अर्हता, आरक्षण, वयोमर्यादा, शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम, इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी आयोगाच्या www.mpsc.gov.in या वेबसाईटवरील सरळसेवा भरती अंतर्गत "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माहितीचे कृपया अवलोकन करावे. आयोगाच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात येईल.

**१०. शुल्क : १०.१** अमागास - **रु. ४१०/- १०.२** मागासवर्गीय - **रु .२१०/-**

**११. अर्ज करण्याची पध्दत** -

**११.१** प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.

**११.२** पात्र उमेदवाराला वेब-बेस्ड (Web-based) ऑनलाईन अर्ज www.mpsconline.gov.in या वेबसाईटद्वारे **दिनांक ६ डिसेंबर, २०१२** ते **दिनांक ३ जानेवारी , २०१३** या कालावधीत सादर करणे आवश्यक राहील.

**११.३** ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना आयोगाच्या www.mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. तसेच ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचे प्रात्यक्षिक (Demo) सदर वेबसाईटवर पाहता येईल.

**११.४** विहित पद्धतीने आयोगास अर्ज सादर केल्यानंतर परीक्षा शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**११.५** आयोगाने निश्चित केलेला परीक्षा शुल्क खालील पद्धतीने भरता येईल :-

(१) भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे (२) क्रेडिट कार्ड (३) डेबीट कार्ड (४) नेटबँकिंग (५) कॅश कार्ड

**११.६** भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरल्यावर दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर (Working Days) उमेदवाराच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा (Transaction ID Updated Successfully) एस.एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.

**११.७** विहित पद्धतीने अर्ज सादर करुन परीक्षा शुल्क क्रेडिट कार्ड, डेबीट कार्ड, नेटबँकिंग अथवा कॅश कार्डद्वारे भरल्यानंतर उमेदवारांच्या मोबाईल क्रमांकावर आयोगास रक्कम प्राप्त झाल्याबाबतचा (Payment Received) एस.एम.एस. आयोगाकडून पाठविण्यात येईल. तसेच उमेदवाराच्या प्रोफाईलमध्ये Application Status द्वारे रक्कम प्राप्त झाल्याबाबत सूचना प्राप्त होईल.

**११.८** दोन कार्यालयीन कामकाजाच्या दिवसानंतर आयोगाकडून एस.एम.एस. प्राप्त न झाल्यास अथवा प्रोफाईलद्वारे सूचना प्राप्त न झाल्यास ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या Feedback द्वारे Registration ID, Transaction ID व चलनावरील बँकेत रक्कम भरल्याचा दिनांक आयोगास पाठवावा. बँकेकडून प्राप्त झालेल्या Transaction ID ही नोंद अचूकपणे झाली असल्याबाबत खात्री करण्याची जबाबादारी उमेदवाराची राहील.

**११.९** चाळणी परीक्षेपूर्वी ७ दिवस अगोदर उमेदवारास प्रवेश प्रमाणपत्र त्यांच्या प्रोफाईलद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याची प्रत उमेदवाराने चाळणी परीक्षेपूर्वी डाऊनलोड करुन घेणे व चाळणी परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

**११.१०** चाळणी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय चाळणी परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

**१२.** विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याची अथवा क्रेडिट कार्ड, डेबीट कार्ड, नेटबँकिंग अथवा कॅश कार्डद्वारे रक्कम भरण्याची कार्यवाही दिनांक **३ जानेवारी, २०१३** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

**१३.** चलनाव्दारे परीक्षाशुल्क भरावयाचे झाल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक ४ जानेवारी, २०१३ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत भरणे बंधनकारक आहे.

**१४ महत्वाच्या सूचना- उमेदवाराने मुलाखतीच्या वेळी सर्व आवश्यक मूळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक आहे. सदर मूळ प्रमाणपत्रे मुलाखतीचे वेळी सादर न केल्यास मुलाखत घेण्याचे नाकारले जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

**मुंबई :**
**दिनांक : ६ डिसेंबर, २०१२.**

**प्र. दा. अडसुळे**
उपसचिव , महाराष्ट्र लोकसेवा आयोग